**वैशिष्ट्ये:** पांढरा करडा रंग, उंच मान, शिंगे गोल बुटकी, लांबट निमुळता चेहरा, शिंगाच्या मध्ये उठावदार भाग असतो. सरासरी १२०० ते १४०० किलो दुध उत्पादन ५% फॅट असते. बैल जलद व जोरात पळतात.

### २) देवणी :

**मूळ स्थान:** ही जात देवणी, बालाघाट, अहमदपुर, उदगीर, उस्मानाबाद या ठिकाणी आढळते.



**वैशिष्ट्ये:** तोंड काळे पांढरे, तांबडा पांढरा रंग किंवा ठिपके, लांब कान, गिर जातीसारखा चेहरा एका वेतामध्ये दुग्धोत्पादन ९०० – १००० किलो फॅट ४.५% असते.

## क) ओढ कामासाठी उपयुक्त देशी गाई :

भारतातील बहुसंख्य गायींची जोपासना शेतीला बैलासाठीच केली जाते. त्यामुळे या गटातील गायीच्या दुध उत्पादनामध्ये वाढ झालेली नाही. शेती व वाहतुकीच्या कामासाठी बैल सर्वोत्तम समजले जातात. यामध्ये अमृत महल, कांगायाम, माळवी, हळिकर, खिलार, डांगी, लाल कंधारी या जाती येतात.

### १) खिलार :



**मूळ स्थान :** महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, सातारा जिल्हे

**वैशिष्ट्ये:** पांढरा, करडा रंग, मध्यम मजबूत बांधा, टोकदार शिंगे, चपळ, तरतरीत दिसायला देखणी, शेती कामासाठी उत्तम आहे. या जातीमध्ये काही उपप्रकार आढळून येतात.

### २) डांगी :

**मूळ स्थान :** नाशिक जिल्ह्यामध्ये इगतपुरी, अकोला, अहमदनगर व गुजरात येथे आढळते.

**वैशिष्ट्ये :** आकाराने मध्यम, कपाळ उंचावलेले, चेहरा लांबट, शिंगे जड, बोथट, कातडी तेलकट, रंग पांढरा असून काळे गोलाकार ठिपके सर्वांगावर असतात. पाऊसमान जादा असणाऱ्या चिखलात चांगल्या प्रकारे काम करू शकतात.



### ३) लाल कंधारी :

**मूळ स्थान :** कंधार, हिंगोली, बिलोली, अहमदनगर येथे आढळते.

**वैशिष्ट्ये :** मध्यम शरीर, रेखीव पिळदार बांधा, खांदा भरीव, सरळ पाठ, पाय आखूड, रंग लाल, बैल रंगाने गडद, डोळ्याभोवती काळे वलय असते. या गाईमध्ये अतिशय उच्च पुनरुत्पादन कार्यक्षमता आहे.



* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

करा देशी गोवंश संगोपन । करील दूध आरोग्य संपन्न ।।
खत गोमुत्राची किमया न्यारी । सशक्त जमिन अन् उत्पादन भारी ।।

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *


संपादक व प्रकाशक
**डॉ. ला. रा. तांबडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

◦ लेखक ◦

**डॉ. प्रकाश वि. कदम**
विषय विशेषज्ञ (पशुवैद्यक शास्त्र)

**डॉ. ला. रा. तांबडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख


कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर



तांत्रिक माहिती स्त्रोत
राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्युरो, कर्नाल (हरियाणा)

प्रकाशन वर्ष : मार्च २०१६ | एकुण घडी पुस्तिका क्र.४३ | एकुण प्रकाशन क्र.५१ | प्रति : २०००


# देशी गोवंश




वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
शबरी कृषि प्रतिष्ठान सोलापूर संचलित,
**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**
सोलापूर-बार्शी रोड, मु.खेड, पो.केगाव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र)
फोन : ०२१७-२५००१५३
Visit us at : www.kvksolapur.org

# देशी गोवंश

भारतीय गोवंशाचे वर्गीकरण प्रथम १९३८ मध्ये शारिरीक ठेवणीवरून करण्यात आले. पुढे त्यामध्ये बऱ्याच शास्त्रज्ञांनी फेर विचार करुन सध्याची वर्गवारी करण्यात आली. सध्या देशी गाईच्या ३९ जाती असून त्याची वर्गवारी दुधासाठी व शेती कामासाठी आणि शेती व ओढ कामासाठी केली आहे.

## अ) अधिक दुध देणाऱ्या देशी गाई

### (१) साहिवाल :

**मूळ स्थान :** पाकिस्तानमधील मोटगोमेरी जिल्हा पंजाब, हरियाणा, दिल्ली, उ.प्रदेश, बिहार, म.प्रदेश, प.बंगाल येथे आढळतात.

**वैशिष्ट्ये :** कातडी सैल, वजनदार बांधा, रुंद माथा, जाड छोटी शिंगे, अंगावर लाल रंगाची छटा असते, कास मोठी, सड सारख्या लांबीचे, गाईचे ३०० दिवसांचे दूध २२०० ते २३०० किलो आहे. निवडक गाई ४५०० किलो पर्यंत दूध उत्पादन फॅट व ४%-६% दोन वेतातील अंतर १५ महिने तसेच बैल शेतकामासाठी व वाहतुकीसाठी उपयोगी आहेत.



### २. गीर:

**मूळ स्थान :** गुजरातमधील काठेवाड

**वैशिष्ट्ये :** माथा गोलाकार पुढे आलेला, लोंबणारे लांब कान, खालचा जबडा मजबूत, पोळीचा भाग गळ्यापर्यंत आलेला सरासरी दुध उत्पादन १००० ते १२०० किलो निवडक गाई ३०० दिवसात ३५०० किलो दूध देतात. बैल ताक तवान असतात, परंतु मंद गतीने काम करतात. सावकाशीच्या जड कामासाठी उपयोगी.



### ३. लाल सिंधी :

**मूळ स्थान :** पाकिस्तानातील सिंध प्रांत आपल्या देशात अलाहाबाद, शिलाँग, जबलपूर या ठिकाणी या गाई आढळतात.

**वैशिष्ट्ये :** जनावरे मध्यम समांतर आणि घट्ट बांध्याची असतात. डोके रेखीव व मध्यम आकाराचे, माथा रुंद व चपटा असून केसांचा झुपका असतो. कान मध्यम तिरपे असतात. शिंगे लहान व आतल्या बाजूला वळालेली असतात. पोळी खाली जास्त लोंबकळती असते. या गाईची थायलेरीसीस व लाळ्या-खुरकुत या रोगासाठी प्रतिकार शक्ती चांगली असते. सरासरी ३०० दिवसांचे दुध उत्पादन २००० ते २१०० लिटर आहे. निवडक गाई ४००० लिटर दूध देतात. बैल शेतीच्या व वाहतुकीच्या कामासाठी उपयोगी असतात.



### ४. थारपारकर :

**मूळ स्थान :** पाकिस्तानमधील सिंध प्रातांतील वाळवंटी भाग

**वैशिष्ट्ये :** मजबूत व मध्यम लांबीची असतात. माथा रुंद व चपटा असतो. शांत डोळे व थोडेसे लोंबणारे कान, पोळी लवचिक असते. शेपटी बारीक खालपर्यंत लोंबणारी, खूर टणक काळे असतात. एका वेतात सरासरी ११०० किलोपर्यंत दूध देतात. निवडक गाई २७०० ते २८०० किलो पर्यंत दूध देतात. बैल शेती कामासाठी उपयोगी ही या जातीची वैशिष्ट्ये आहेत.



### (४) वेचूर गाय :

**मूळ स्थान :** केरळ राज्यातील कोट्टायम जिल्ह्यातील वेचूर गाव या गाईचे उगम स्थान आहे.

**वैशिष्ट्ये :** हि आकाराने जगातील सर्वात छोटी गाईची जात आहे. या जातीच्या गाईची सरासरी लांबी १२४ से.मी. व उंची ९० से.मी. असून वजन १३० किलोपर्यंत असते. या गाईला कमी अन्न लागते व अन्नाच्या प्रमाणात दूध उत्पादन जास्त देते. (सरासरी ३ लिटर प्रति गाय प्रति दिन) आयुर्वेदामध्ये या गाईच्या दूधाचे महत्व सांगितलेले आहे.



अलिकडील संशोधनात प्रतिजैवकाची शक्ती असलेले लॅक्टोफेरिन प्रथिन या गाईच्या दूधामध्ये आढळले असून हे अम्पीसिलीन या रोग नाशक (जिवाणू नाशक) औषधापेक्षा ही अधिक परिणामकारक आहे. लॅक्टोफेरिन प्रथिन हे सूक्ष्म जिवाणूनाशक, विषाणूनाशक, ट्युमरनाशक आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे आहे. लॅक्टोफेरिन प्रथिन या गाईच्या दूधामध्ये सर्वात जास्त प्रमाणात आढळते. या गाईचे दूध मलाईदार, भरपूर स्निग्धांश असलेले व चविष्ठ असते. दूधापासून बनवलेले तूप औषधी गुणधर्म असलेने प्रसिद्ध आहे. या गाईमध्ये लाळ्या-खुरकुत रोग प्रतिकारशक्ती असल्याने हा रोग या गाईला होत नाही. ही जात नामशेष होण्याच्या अवस्थेमध्ये असून फक्त २०० गाई शिल्लक आहेत. यातील १०० गाई पशुवैद्यकीय महाविद्यालयामध्ये जतन केलेल्या आहेत.

## ब) दुहेरी उद्देशीय देशी गाई :

या गटातील गाईमध्ये दुधाळ व ओढ शक्तीसाठी उपयुक्त अशा जातीचे गुणधर्म एकत्रित झालेले दिसून येतात. यामध्ये हरियाणवी,देवणी, कांक्रेज (नंदीबैल) गौळण, कृष्ण कांती, मेवारी या जाती येतात.

### १) हरियाणवी :

**मूळ स्थान :** ही जात हरियाणा या राज्यामध्ये आढळते.

